# भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्त्या

**सौ. रोहिणी सतीश कुंभार,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

**डॉ. संजय संपकाळ,** मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटना दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाली. या राज्यघटनेमध्ये अनेक घटना दुरुस्त्या झालेल्या आहेत. भारतीय राज्यघटना अंमलात आल्यापासून इ. सन २०१८ सालापर्यंत एकूण १०४ घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. सर्वात पहिली घटना दुरुस्ती ही केवळ संविधान अमलात आल्याच्या दुसऱ्या वर्षी १९५१ साली झाली होती. भारतीय संविधान दुरुस्तीचे विधेयक बिल केवळ संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते. परंतु राज्य विधानसभेत मांडता येत नाही. केंद्र सरकार व कोणीही खासदार हा प्रस्ताव मांडू शकतो. जर प्रस्ताव सरकारने मांडला तर तो सरकारी आणि जर वैयक्तिक खासदाराने मांडला तर ते खाजगी विधेयक असते. भारतीय संविधानाचा कोणताही भाग एकाच पद्धतशीरपणे बदलला जाऊ शकत नाही . त्याचा परिच्छेदाच्या महत्त्वनुसार विभिन्न पद्धतीचे अनुकरण होते.

**उद्देश :**

1. घटना दुरुस्तीच्या प्रक्रियेचा अभ्यास करणे.
2. घटनादुरुस्तीच्या दुरुस्तीचे प्रकार अभ्यास करणे.
3. आत्तापर्यंतच्या महत्त्वाच्या घटना दुरुस्त्या झाल्या त्याचा अभ्यास करणे

**विषय विवेचन : -**

कोणत्याही इतर लिखित राज्यघटनेप्रमाणे बदलत्या परिस्थितीनुसार व गरजानुसार त्यात सुधारणा करण्यासाठी राज्यघटनेत सुद्धा घटनादुरुस्तीची तरतूद केली गेली आहे. घटनेचा भाग २० मधील कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्ती करण्याचा संसदेचा अधिकार आणि त्याची प्रक्रिया सांगितली आहे . घटनेने दिलेल्या अधिकारानुसार संसद घटनेतील तरतुदीमध्ये नव्याने समावेश करून बदल करून किंवा रद्द करून यासाठी ठरवून दिलेल्या प्रक्रियेनुसार घटना दुरुस्ती करू शकतात.

घटना अंमलात आल्यापासून ७५ वर्षात भारतीय राज्यघटनेत जवळपास १०४ घटनादुरुस्त्या केलेल्या आहेत. म्हणजेच काळ आणि बदलत्या परिस्थितीनुसार घटनेत दुरुस्तीची आवश्यकता असते . कलम ३६८ मध्ये घटनादुरुस्तीची प्रक्रिया सांगितली असून ही प्रक्रिया खालील प्रमाणे आहे.

- घटना दुरुस्ती कोणत्याही सभागृहात सादर करता येते मात्र राज्य विधिमंडळात सादर करता येत नाही.
- असे विधेयक मंत्री किंवा इतर सदस्य सादर करू शकतात.
- हे विधेयक प्रत्येक सभागृहाने संमत केले पाहिजे किंवा २ /३ बहुमताने संमत करावे .
- जर विधेयकाने संघ राज्यांमधील तरतुदीमध्ये दुरुस्ती होणार असेल तर अर्ध्यापेक्षा अधिक राज्याच्या विधिमंडळाने साध्या बहुमताने त्याला मान्यता दिली पाहिजे.
- संसदेच्या दोन्ही गृहाने मान्यता दिल्याने व राज्य विधिमंडळाने संमती दिल्यावर विधेयक राष्ट्रपतीच्या मानण्यासाठी मान्यतेसाठी सादर करतात.
- राष्ट्रपतीचे मान्यता मिळाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते म्हणजेच घटनादुरुस्तीचा कायदा होतो.

**घटनादुरुस्ती चे प्रकार : -**

भारतीय राज्यघटनेच्या ३६८ च्या कलमात दुरुस्तीचे तीन मार्ग सांगितले आहेत.

१ ) संसदेच्या साध्या बहुमताने

२ ) संसदेच्या विशेष बहुमताने

३ ) संसदेच्या विशेष बहुमताने आणि घटक राज्यांच्यासंमतीने

**१) संसदेच्या साध्या बहुमताने : -**

या पद्धतीनुसार घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात स्वतंत्रपणे मांडले जाते. दोन्ही सभागृहातील उपस्थित सभासदांच्या बहुमताने व राष्ट्रपतींची त्यावर सही मिळताच घटनादुरुस्ती होते. पुढील विषयांच्या संदर्भात साध्या बहुमताने घटनादुरुस्ती होते. उदा : नवीन राज्याची स्थापना व निर्मिती , नागरिकत्व संबंधित कायदे, सर्वोच्च न्यायालयाची कार्यक्षमता व सर्वोच्च न्यायालयातील कनिष्ठ न्यायाधीशांची संख्या, अधिकृत भाषा ठरविणे, राष्ट्रपती , राज्यपाल, सभापती, न्यायाधीश ,संसद सदस्याचे वेतन ठरविणे, घटक राज्याची विधानपरिषद रद्द करणे किंवा स्थापन करणे.

**२) संसदेच्या विशेष बहुमताने : -**

या पद्धतीमध्ये घटनादुरुस्ती विधेयक हे संसदेच्या विशेष बहुमताने दुरुस्ती करता येते . दोन्ही सभागृहातील सदस्य संख्या ५० टक्के पेक्षा जास्त उपस्थित राहून मतदान करण्याचा सभासदांच्या २/३ बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे. अशा मंजूर झालेल्या

विधेयकाला राष्ट्रपतीची संमती मिळाल्यानंतर घटनादुरुस्ती विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. म्हणजेच घटना दुरुस्ती होते. घटनेतील मोठा भाग या प्रक्रियेद्वारा दुरुस्त केला जातो. मूलभूत अधिकार मार्गदर्शक तत्वे यामध्ये या पद्धतीने दुरुस्ती केली जाते.

**३) संसदेच्या विशेष बहुमताने व घटक राज्यांच्या बहुमताने घटनादुरुस्ती :-**

या पद्धतीनुसार घटनादुरुस्तीचा ठराव संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येतो. संसदेच्या विशेष बहुमताने व घटक राज्यांच्या विधिमंडळाच्या साध्या बहुमताने मान्यता आवश्यक असते. एकूण घटक राज्यापैकी निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांनी तो ठराव मंजूर केल्यानंतर राष्ट्रपतींच्या संमतीने घटनादुरुस्ती विधेयक मंजुरी झाले असे समजतात.

यामध्ये राष्ट्रपतींची निवडणूक व या निवडणुकीच्या प्रक्रिया केंद्र सरकार आणि घटक राज्य यांचे कार्यकारी अधिकाऱ्याची व्याप्ती तसेच कायदेविषयक अधिकारांची विभागणी, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय अधिकार क्षेत्र, संसदेतील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व या प्रक्रियांचा अवलंब केला जातो .

वरील तीन पद्धतीने भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करण्यात येते. यात अत्यंत सोप्या पद्धतीपासून कठीण पद्धतीचा ही स्वीकार केलेला आहे . यातून भारतीय राज्यघटनेने लवचिकता व परिदृढता यांच्या सुवर्णमध्य साध्य केलेला आहे. म्हणूनच भारतीय राज्यघटना ही अंशतः लवचिक व अंशतः परिदृढ अशी आहे.

**सारांश :**

या प्रकारे भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू असताना घटनाकारांनी या गोष्टीची विशेष काळजी घेतली होती की, आपल्या देशाची घटना ही सदैव आपल्या नागरिकांचे हित जोपासत न्यायालयीन, प्रशासकीय कार्य चालवण्यासाठी अद्ययावत आणि सक्षम असायला हवी, ती कधीही कालबाह्य होता कामा नये, तिच्यात कालानुरूप बदल करता आले गेले पाहिजेत, घटनाकारांनी या विषयांवर काम करत असताना हा विचार करून की आपण आज भारत स्वतंत्र झाल्यावर लगेच जे संविधान तयार करत आहोत ते आत्ताच्या परिस्थितीवर आणि आपल्या देशाच्या सध्याच्या गरजांना अनुसरून तसे अनुकूल संविधान बनवत आहोत, काही काळाने आपल्या या संविधानात आपल्याला बदल करावा लागेल आणि तसा बदल करण्याची तरतूद देखील करण्यात आली आणि संविधानात 'कलम 368' चा समावेश करण्यात आला. संविधानाचे 'कलम ३६८' चा वापर करून संसद घटनादुरुस्ती करू शकते, घटनादुरुस्तीचा अधिकार हा फक्त संसदेला देण्यात आला आहे. 'कलम ३६८' नुसार घटनेत बदल करण्याची प्रक्रिया देण्यात आली आहे. 'कलम ३६८' नुसार संविधानातील कलम हटवणे, त्यात बदल करणे, संविधानात एखाद्या नव्या कलमाचा समावेश करणे, एखाद्या कलमात फेरबदल करणे तसेच एखाद्या कलमात उपकलम जोडणे अशा दुरुस्त्या करण्याचा अधिकार हा संसदेला देण्यात आला होता आणि आजही तो अधिकार भारतीय संसदेकडेच आहे. मात्र, राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करण्याचा अधिकार संसदेला नाही.

**संदर्भसूची :**

1. कुलकर्णी श्री.प., डॉ. साठे शुभा, डॉ. कडू, माहिनी (संपा), "भारतीय राजकारणी दशा आणि दिशा", विजय प्रकाशन, नागपू.
2. भाळे भा.ल., "भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण," पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर -२०१० पृ.५५३
3. लोटे रा.ज., " भारतीय शासन आणि राजकारण", पिंपळापूरे प्रकाशन नागपूर-२००५
4. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र
5. दैनिक सकळा वृत्तपत्र
6. दैनिक लोकमत वृत्तपत्र